# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

## उद्यान विभाग

(महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे संरक्षण व जतन  अधिनियम १९७५ चे कलम ८.३ (क) नुसार)

# जाहीर नोटीस

दिनांक :- १५ /०६ /२०२३

भिवंडी नि.शहर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या आवारातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया अलीकडील असलेल्या मोकळया जागेत नागरीकांना स्वच्छता विषयक जनजागृती करणे कामी बसविण्यात आलेल्या एल.ई.डी. स्क्रिनल कडुलिंबाचे झाड अडथळा करत असल्याने सदरचे झाड दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावे, याबाबत प्रभारी कार्यकारी अभियंता विद्युत भिवंडी मनपा यांनी जा.क्र./भिनिशमनपा/विद्युत/३३०/२०२३, दि. ३०/०५/२०२३ चे इकडील उद्यान आ.क्र./५४१,दि.३१/०५/२०२३ रोजी पत्र प्राप्त झाले आहे. तसेच मनपाच्या नविन प्रशासकीय इमारत आवारातील फॉक्स्टेल पामचे झाड डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करणे कामी अडथळा करित असल्याने सदरचे झाड काढुन उपलब्ध जागी पुर्नरोपण करावे असे मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांनी मौखिक निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त ठिकाणावरील मनपाच्या कामात बाधीत झालेली कडुलिंब – ०१ व फॉक्स्टेल पाम – ०१ अशी एकुण ०२ झाडे सुस्थितीत काढुन उपलब्ध जागी पुर्नरोपण करणेची प्रस्तावित आहे. सदरची झाडे मनपाच्या कामात बाधीत होत असल्याने सदर झाडासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करावयाची आहे.

तरी महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८.३ (क) नुसार सदरच्या जागे संबधी व जागेवरील झाडे संबधी कोणाचा आक्षेप हक्क अथवा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखे पासुन ७ दिवसांच्या आत लेखी सबळ कारणासह व पुराव्यासह आमच्या कार्यालयात समक्ष सादर करावे. विहीत मुदतीमध्ये हरकत प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र नागरी क्षेत्रे झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ चे (३) नुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल व त्यानंतर कोणतीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(नितीश संखे)
उद्यान अधिक्षक
भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी